I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** डेक्कन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0114 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/07/2023 04:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 11/07/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/07/2023
   **Time From (वेळेपासून):** 14:26 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/07/2023 **Time (वेळ):** 04:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 005
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/07/2023 04:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग,पुणे महानगरपालिका, कर्वे रोड, पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.तानाजी महादेव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सर्वे नं-258, बालाजी,पार्क, विद्यांचल स्कुल, , बाणेर, पुणे-411045, डेक्कन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सर्वे नं-258, बालाजी,पार्क, विद्यांचल स्कुल, , बाणेर, पुणे-411045, डेक्कन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9921431062

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.उमेश राजाराम कवठेकर | | | 1. सर्वे नं-38/1, कन्हैया , मजिस्टी, फ्लट नं-105, पनकार्ड क्लब रोड, बाणेर, पुणे, 11045 ,चतु:श्रृंगी ,पुणे शहर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनाच्या 500/ रु. दराच्या एकुण 50 नोटा. | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक-12/07/2023

मी श्री.तानाजी महादेव शिंदे, वय-31वर्षे, व्यवसाय-लायझनिंग, राहणार-सर्वे नं-258, बालाजी पार्क, विद्यांचल स्कुल, बाणेर, पुणे-411045, मोबाईल नंबर-9921431062.

समक्ष पुणे अँटी करप्शन ब्युरोच्या कार्यालयामध्ये हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक-11/07/2023 रोजी अँटी करप्शन ब्युरो, पुणे येथे दिलेल्या तक्रारीवरुन अँटी करप्शन ब्युरोचे पोलिस निरीक्षक श्री.संदिप व-हाडे यांनी माझी लेखी तक्रार घेतली ती पुढीलप्रमाणे-

"वरील विषयान्वये विनंती की, मी पुणे महानगरपालिकेचा परवाना धारक प्लंबर असुन बिल्डरने बांधकाम पुर्ण केलेल्या इमारतीचे संदर्भाने चतु:श्रृंगी पाणी पुरवठा विभाग पुणे महानगरपालिकेचे ना-हरकत पत्र मिळवण्यासाठी मी लायझनिंगचे काम करतो व सदरचे ना-हरकत पत्र मिळवण्यासाठी बिल्डरने केलेल्या अर्जासोबत माझा प्लंबिंगचा परवाना जोडलेला असतो.

वरीलप्रमाणे मी काम करत असुन दिनांक-10/05/2023 रोजी अर्जदार श्री.आशिष माधव मालपाणी यांनी सि. स.नं.-2281 ते 2288, शिवाजीनगर, भांबुर्डा, पुणे-05 येथील मिळकतीचे चतुश्रृंगी पाणी पुरवठा विभागाचे ना-हरकत पत्र मिळणेसाठी माझ्या प्लंबिंग लायसन्सची प्रत जोडुन अर्ज केला असुन ना-हरकत पत्र मिळणेसाठी मी पाठपुरावा करत आहे.

काल दि.-10/07/2023 रोजी मी ना-हरकत पत्र घेण्यासाठी कर्वे रोड ऑफिस, चतुश्रृंगी पाणी पुरवठा विभाग, पुणे मनपा येथे गेलो असता येथील मिटर रिडर श्री.उमेश कवठेकर यांनी माझ्याकडे पाणी पुरवठा विभागाचे ना-हरकत पत्र देण्यासाठी 25,000/- (पंचवीस हजार रुपये) ची मागणी केली आहे. सदरची रक्कम ही लाच रक्कम असुन माझी त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. माझा व श्री.उमेश कवठेकर मिटर रिडर पाणी पुरवठा विभाग, पुणे मनपा यांच्या मध्ये कुठलेही आर्थिक व्यवहार नाही. तसेच पैशांचे देणे-घेणे नाही. तरी श्री.उमेश कवठेकर, मीटर रिडर यांचेवर आपल्या विभागामार्फत कार्यवाही करण्यास विनंती आहे."

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी पोलिस निरीक्षक व-हाडे यांनी माझेसोबत व्हाईस रेकॉर्डर दिला तसेच त्यांच्यासोबत असलेल्या शासकीय पंचांपैकी श्री.दशरथ बगरे यांना माझ्यासोबत देवुन चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, कर्वेरोड, पुणे महानगरपालिका येथील उमेश कवठेकर, पद-मीटर रिडर यांना भेटण्यासाठी रवाना केले. त्यानंतर मी चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, कर्वेरोड, पुणे येथे जावुन श्री.उमेश कवठेकर यांची भेट घेतली व त्यांचेशी कामासंबंधाने चर्चा केली. त्यानंतर मी पुन्हा पोलिस निरीक्षक व-हाडे व त्यांचे पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवुन घडलेली हकिगत सांगितली. त्यावेळी श्री.व-हाडे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डरमधील रेकॉर्डींग ऐकली. त्यावरुन श्री.उमेश कवठेकर यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री.दुदुसकर, उपअभियंता, चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे यांचेसाठी 10,000/- रुपये व श्रीमती वैशाली गिरगे, कनिष्ठ अभियंता, चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे यांचेसाठी 10,000/- रुपये व त्यांचे स्वत:साठी 5000/- रुपये मागितल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिस निरीक्षक व-हाडे यांनी मला लाच मागणी झालेली रक्कम 25,000/- रुपये मला हजर करणेस सांगितली त्याप्रमाणे 500/- रुपये दराच्या 50 नोटा मी पोलिस निरीक्षक व-हाडे यांचेकडे दिल्या. त्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन माझेकडे परत दिल्या. व माझेसोबत व्हाईस रेकॉर्डर देवुन शासकीय पंच श्री.दशरथ बगरे यांचेसोबत सदरची लाच रक्कम



Scanned with OKEN Scanner

मीटर रिडर श्री.उमेश कवठेकर यांना देण्यासाठी चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, कर्वेरोड, पुणे येथे रवाना केले. व माझे पाठोपाठ पोलिस निरीक्षक व-हाडे व त्यांचे पथक चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, कर्वेरोड, पुणे येथील कार्यालयाचे आजुबाजुला येवुन थांबले.

मी श्री.उमेश कवठेकर यांची भेट घेण्यासाठी चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, कर्वेरोड, पुणे येथे गेलो असता त्याठिकाणी ते हजर होते, परंतु ते गडबडीमध्ये असल्याने मी त्यांचेशी बोलुन लगेच श्रीमती वैशाली गिरगे मॅडम यांना जावुन भेटलो. तेव्हा श्रीमती वैशाली गिरगे मॅडम यांचेशी माझे कामासंबंधाने चर्चा केली तेव्हा त्यांनी मला सांगितले की, "तुमच्या फाईलवर सही झाली आहे, तुम्ही जावा" तेव्हा मी पुन्हा श्री.उमेश कवठेकर यांना भेटण्यासाठी आलो असता ते मिटींगसाठी श्री.दुदुसकर साहेबांचे केबिनमध्ये गेले होते. साधारण 10 मिनिटांनी श्री. उमेश कवठेकर बाहेर आले तेव्हा मी त्यांना लाच रक्कम घेवुन आलेबाबत सांगितले असता त्यांनी मला जिन्यामध्ये खाली येण्यास सांगितले. मी त्यांचेमागे जिन्यामध्ये आलो असता त्यांनी हात पुढे केला त्यावेळी मी त्यांचे हातात 25,000/- रुपये दिले. ती रक्कम त्यांनी उजव्या हाताने स्विकारुन मोजुन त्यांचे पॅंटचे उजव्या बाजुचे पुढील खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मी लाच रक्कम लोकसेवक श्री.कवठेकर यांनी स्विकारल्याचा इशारा केला. त्यानंतर पोलिस निरीक्षक व-हाडे यांचे पथकाने मीटर रिडर श्री.उमेश कवठेकर यास ताब्यात घेतले व त्याचे नाव व पद विचारले असता त्याने त्याचे पुर्ण नाव श्री.उमेश राजाराम कवठेकर, वय-54वर्षे, पद-मिटर रिडर, नेमणुक-चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे, राहणार-सर्वे नं-38/1, कन्हैया मॅजिस्टी, फ्लॅट नं-105, पॅनकार्ड क्लब रोड, बाणेर, पुणे-11045 असे सांगितले. त्यानंतर पोलिस निरीक्षक व-हाडे यांनी तेथे तात्काळ पुढील चौकशी करुन कागदपत्राविषी माहिती घेवुन श्री.उमेश कवठेकर यास ताब्यात घेवुन अँटी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालय, सेंट्रल बिल्डींग याठिकाणी येवुन पंचनामा व इतर कार्यवाही पुर्ण केली.

तरी, अर्जदार श्री.आशिष माधव मालपाणी यांनी सिटी सर्वे नं-2281 ते 2288, शिवाजीनगर, भांबुर्डा, पुणे-411005 येथील मिळकतीचे चतुश्रृंगी पाणी पुरवठा विभागाचे ना-हरकत पत्र मिळणेसाठी केलेल्या अर्जाचा मी पाठपुरावा करत असताना लोकसेवक श्री.उमेश राजाराम कवठेकर, वय-54वर्षे, पद-मिटर रिडर, नेमणुक-चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे, राहणार-सर्वे नं-38/1, कन्हैया मॅजिस्टी, फ्लॅट नं-105, पॅनकार्ड क्लब रोड, बाणेर, पुणे-11045 यांनी दिनांक-11/07/2023 रोजीचे 14:26 वाजता ते सायंकाळी 17:40 वाजेच्या दरम्यान चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, कर्वे रोड, पुणे याठिकाणी माझ्याकडे त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री.दुदुसकर, उप-अभियंता, चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे यांचेसाठी 10,000/- रुपये व श्रीमती वैशाली गिरगे, कनिष्ट अभियंता, चतुश्रृंगी पाणीपुरवठा विभाग, पुणे यांचेसाठी 10,000/- रुपये व स्वत:साठी 5,000/- रुपये असे एकुण 25,000/- रुपयांची लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध माझी फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे टाईप करण्यात आली असुन ती बरोबर आहे.

समक्ष- तक्रारदार यांची सही,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vipin venkatesh hasabnis(I (Inspector)) / pnmh51913 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):
मोफत प्रत मिळाली.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vipin venkatesh has
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pnmh51913

पोलीस ठाणे अंमलदार
डेक्कन पोलीस ठाणे,पुणे



Scanned with OKEN Scanner